


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २६७, बुधवार १० जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## लाडक्या बहिणींना जिल्हा बँकेचा आधार !

■ एक रुपयाही न भरता खाते उघडणार ■ आर्थिक भुर्दंड टळण्यासाठी बँक सरसावली ■ बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले यांची माहिती




नगर :प्रतिनिधी

**राज्य सरकारने सुरू केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत कागदपत्रे जमा करण्यासोबतच संबंधित महिलांचे बँकेत खाते उघडण्याचेही काम जिकिरीचे आहे. त्यासाठी अनेक बँकांत त्यांच्या नियमानुसार बचत खात्यात पैसे ठेवून खाते उघडले जाऊ शकते. सरकारचे पैसे मिळण्याआधीच बहिणींना ही गुंतवणूक करावी लागत असल्याचे पाहून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बहिणींच्या मदतीला धावून आली आहे. या योजनेसाठी महिलांना एक रूपयाही न भरता खाते उघडण्याची सुविधा बँकेतर्फे सर्व शाखांत उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले यांनी दिली. या बँकेच्या शाखा ग्रामीण भागात जास्त असल्याने तेथील महिलांची सोय होणार आहे.**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत महिला भगिनींना सरकारतर्फे दरमहा १,५०० रुपये देण्यात येणार आहेत. यासाठी १ जुलै २०२४ पासून फॉर्म भरण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये बँकेचे खाते असणे आवश्यक आहे. यामध्ये होणारी अडचण लक्षात घेता जिल्हा सहकारी बँकेने पुढाकार घेतला आहे. महिलांचे नुकसान होऊ नये व खाते उघडताना आर्थिक भुर्दंड पडू नये यासाठी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने एक रुपयाही न भरता खाते उघडून देण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले, उपाध्यक्ष माधवराव कानवडे व संचालक मंडळ यांनी हा निर्णय घेतला आहे.

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विस्तार कक्षासह एकूण २९८ शाखांचे जिल्ह्यात मोठे जाळे आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागात बँक सर्व खातेदारांना सेवा देत असते. महिलांना आपल्या जवळच्या जिल्हा बँक शाखेत झिरो बॅलन्स (शून्य शिल्लक रक्कम) तात्काळ खाते उघडून घेण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. खाते उघडण्यासाठी महिलांना खाते उघडण्याचे फॉर्म, दोन फोटो, आधार कार्ड झेरॉक्स अशी आवश्यक कागदपत्राची केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे. सोप्या प्रक्रियेद्वारे ही खाती उघडून देण्याच्या सूचना बँकेच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

## वसंत मोरेंनी अखेर हाती घेतली मशाल

■ तब्बल २३ नेत्यांसह केला ठाकरे गटात प्रवेश
■ हा माझा पक्षप्रवेश नाही, मी स्वगृही परतलोय : मोरे



पुणे : प्रतिनिधी

**मनसेनंतर आता वसंत मोरे यांनी वंचितलाही रामराम केले आहे. आज ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत त्यांनी शिवबंधन हाती बांधले आहेत. विशेष म्हणजे त्यांच्यासह पुण्यातील मनसेचे तब्बल २३ नेते आणि पदाधिकाऱ्यांनी देखील ठाकरे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हा मनसेसाठी मोठा धक्का असणार आहे. यावेळी बोलतांना हा माझा पक्षप्रवेश नसून मी स्वगृही परतलो आहे अशी प्रतिक्रिया मोरेंनी दिली.**

**पक्षप्रवेश नाही, परत आलोय- मोरे**

यावेळी बोलतांना वसंत मोरे म्हणाले, १९९३ यामध्ये पहिल्यांदा शाखाप्रमुख झालो. बारावी पास झाल्यानंतर मी शाखाप्रमुख होतो.१६ व्या वर्षी मी शिवसैनिक झालो होतो. माझा हा प्रवेश नाही मी परत एकदा शिवसेनेत आलो आहे. आम्ही सर्व मिळून पुण्यात एक ताकद उभी करू असे मी आश्वासन देतो. माझ्यासह अनेक पुण्यातील नेते स्वगृही परतले आहेत, असे वसंत मोरे म्हणाले.

**पुणे आपल्याला भगवामय करायचंय- ठाकरे**

आता पुण्यातील शिवसैनिकांसाठी मी येणार आहे. पुणे आपल्याला भगवामय करायचे आहे, असे उद्धव ठाकरे उर्वरीत पान ३ वर

## नगर शहराला दोन दिवस उशिराने पाणीपुरवठा होणार

मुख्य जलवाहिनीला नांदगाव शिवारात गळती



नगर : प्रतिनिधी

**नगर शहरास पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य जलवाहिनीला नांदगाव शिवारात गळती सुरू झाली आहे. दुरुस्तीचे काम सुरू असून त्यामुळे या वाहिनीद्वारे पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. परिणामी, शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास दोन दिवस उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असल्याचे महापालिकेकडून कळविण्यात आले आहे.**

सोमवारी सकाळी ११०० एमएम मुख्य जलवाहिनीला नांदगाव शिवारात पाण्याच्या व हवेच्या दाबाने जॉईटमधील रबर रिंग कट होवून गळती लागली आहे. जलवाहिनी दुरूस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. मात्र, त्याला अवधी लागणार आहे. परिणामी काल रोटेशननुसार पाणी वाटप असलेल्या सर्व उपनगरीय भागास उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा झाला. आज मंगळवारी (९ जुलै) रोटेशननुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागासह सर्व उपनगरीय भागास उशिराने व कमी दाबाने पाणी पुरवठा झाला.

दरम्यान, मुळाधरण पाणलोट क्षेत्रात पाऊस सुरू असून धरणात नवीन पाण्याची आवक सुरू झाली आहे. नव्याने आवक झालेले पाणी गढूळ आहे. हे पाणी पूर्वीच्या पाण्यात मिसळल्याने सर्व पाणी कमी जास्त प्रमाणात गढूळ झालेले असते. विळद जलशुध्दीकरण प्रकल्प व वसंतटेकडी जलकुंभ येथे तुरटी व क्लोरीनची मात्रा वाढवण्यात आलेली आहे. तरीही, काही प्रमाणात गढूळ पाण्याचा पुरवठा होण्याची शक्यता आहे. यातून जलजन्य आजाराची शक्यता लक्षात घेता, पिण्याचे पाणी उकळून प्यावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## नगर महापालिकेच्या आयुक्तपदी देविदास पवार

नगरविकास विभागाचा नियुक्तीचा आदेश

नगर : प्रतिनिधी



**गेल्या काही दिवसांपासून नगर महापालिकेच्या आयुक्त पदावर कोणाची नियुक्ती होते. याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, अखेर अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील सहायक आयुक्त देविदास पवार यांची अहमदनगर महापालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती झाली आहे. याबाबत नुकतेच नगरविकास विभागाचे अवर सचिव अ. का. लक्कस यांनी पवार यांच्या नियुक्तीचा आदेश काढला आहे.**

महापालिकेचे तत्कालीन आयुक्त तथा प्रशासक डॉ. पंकज जावळे यांच्यावर लाच मागितल्याप्रकरणी २७ जून रोजी गुन्हा दाखल झाल्यापासून ते पसार झाले आहे. त्यानंतर नगर विकास विभागाने अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांच्याकडे आयुक्त पदाचा प्रभारी पदभार सोपवला होता. मात्र, अखेर देविदास पवार यांची या पदावर नियुक्ती झाली आहे.






# भावपुर्ण श्रध्दांजली



स्वर्गवास दि.०२/०७/२०२४

**कै.बबनराव ठकाराम कावरे (चेअरमन)**

–दशक्रिया विधी–
गुरूवार दि. ११/०७/२०२४ रोजी,सकाळी८.०० वा.
ठिकाण–संगमेश्वर घाट ,पारनेर

–● शोकाकुल ●–
गं.भा.संगिता बबन कावरे (पत्नी)
● श्री.राहुल बबन कावरे (मुलगा) ● सौ.मधू राहुल कावरे (सुन)
● श्री.प्रमोद बबन कावरे (मुलगा) ● सौ.सोनाली प्रमोद कावरे (सुन)

समस्त कावरे परिवार
आप्तेष्ठ नातेवाईक ,समस्त–ग्रामस्थ सिध्देश्वरवाडी / पारनेर







# चंदेरी

## ...म्हणून रविना टंडनने केले घटस्फोटिताशी लग्न!



बॉलीवूड अभिनेत्री रविना टंडन तिच्या काळातील एक आघाडीची अभिनेत्री होती. अभिनयाच्या बळावर तिने अनेक चित्रपट यशस्वी करून दाखवले. आजही ती बॉलिवूडमध्ये सक्रिय आहे. करिअरच्या शिखरावर असताना तिच्याकडे अनेक जाहिराती होत्या. जाहिरातींमधून सुद्धा तिने कोट्यवधी रुपयांची कमाई केली. अभिनेत्यांपासून तर चित्रपटसृष्टीची निगडित असलेल्या अनेकांचा रविनावर जीव जडला होता. मात्र असे असताना रविनाने एका घटस्फोटित उद्योगपतीशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. रविनाच्या या निर्णयाचे त्यावेळी अनेकांना आश्चर्य वाटले. मात्र गेल्या २२ वर्षांपासून दोघांचा सुखाचा संसार सुरू आहे. घटस्फोट, ब्रेकअप या गोष्टी बॉलिवूडला नवीन नाहीत. बॉलिवूडमध्ये कुणाचे नाते फार काळ टिकत नाही. मात्र असे असताना रविनाचा तिच्या पतीसोबतचा संसार अतिशय आनंदात सुरू आहे.

उद्योगपती आणि चित्रपट वितरक अनिल थडाणी आणि रविना पहिल्याच भेटीत एकमेकांच्या प्रेमात पडले होते. पहिल्या भेटीच्या दोन महिन्यांनंतर दोघांनी एकमेकांच्या प्रेमाची कबुली दिली. योग्य जीवनसाथी मिळाल्याची खात्री झाल्याने दोघांनी लग्नाला उशीर केला नाही. विशेष म्हणजे रविनाने लग्नाआधीच दोन मुलींना दत्तक घेऊन आई होण्याचा निर्णय घेतलेला होता. जो व्यक्ती आपल्या मुलींनासुद्धा प्रेम देईल त्याच्याशीच लग्न करेल, असा निर्णय रविनाने घेतलेला होता आणि उद्योगपती अनिल यांनी रविनाच्या निर्णयाचा स्वीकार केला. त्याचबरोबर दोघांच्या लग्नाचा मार्ग मोकळा झाला. लग्नानंतरसुद्धा अनिल रविनाला दिलेले वचन पाळताना दिसत आहे. पतीच्या वाढदिवशी रविनाने केलेल्या एका पोस्टमध्ये पतीचे खूप कौतुक केले. जो तुम्हाला जसेच्या तसे स्वीकारतो असा जोडीदार कुणाला नको असेल. सर्वोत्तम पती, वडील, जावई असे रविनाने पतीचे कौतुक केले आहे. दोघांच्या प्रेमामुळे त्यांचे नाते आजपर्यंत मजबुतीने टिकून आहे.

## मानधनातील तफावतीवरून हुमा कुरेशीचा संताप!

बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशी नेहमीच चर्चेत असते. सोशल मीडियावरसुद्धा तिचे लाखो चाहते आहेत. सध्या ती तिच्या एका विधानामुळे चर्चेत आली आहे. बॉलिवूडमध्ये अभिनेते आणि अभिनेत्रींना मिळणाऱ्या मानधनात प्रचंड तफावत असते. नायकांइतके मानधन मिळविण्याचा आमचाही अधिकार आहे, आमचीही योग्यता आहे, असे विधान तिने केले आहे.

ज्या चित्रपट आणि वेब सीरिजमध्ये मला सशक्त महिला पात्र साकारायला मिळतात, त्या चित्रपटांचा आणि वेब सीरिजचा एक भाग म्हणून मी स्वतःला भाग्यवान समजते. एक समाज म्हणून आपल्याला सशक्त महिला आवडत नाहीत. आम्हाला अशा स्त्रिया आवडतात ज्या त्यांच्या विचार आणि भावनांबद्दल बोलू शकत नाहीत. हे आपल्या चित्रपटांमध्येही दिसून येते, असे हुमा म्हणाली. मात्र आता काळ बदलत आहे आणि महिला केंद्रित भूमिकांना सुद्धा अधिक मागणी आहे. बॉलीवूडमधील अभिनेत्रींच्या पगारातील तफावतीवर भाष्य करताना हुमा म्हणाली, की पुरुष नायकांना पुरुषकेंद्रित चित्रपट करून स्वतःला सिद्ध करण्याची गरज नाही. मात्र महिलांना स्त्री केंद्रीत चित्रपट करून स्वतःला सिद्ध करावे लागते. बॉलिवूडमध्ये अभिनेत्यांना जेवढे मानधन मिळते तेवढे मानधन मिळविण्याचा आमचाही अधिकार आहे. बॉलिवूडमध्ये अनेक अभिनेत्री स्वतःच्या हिमतीवर चित्रपटाला हिट करत आहेत. त्यामुळे अधिक मानधन मागण्याची आमची योग्यता आहेच, असे हुमा कुरेशी म्हणाली.



**अजय देवगण आणि काजोलच्या लग्नाचा २५ वा वाढदिवस गेल्या आठवड्यात साजरा झाला. पडद्यावर त्यांची जोडी सुपरहिट ठरलीच; मात्र त्याहीपेक्षा पती- पत्नी म्हणून दोघांचे नाते सुपरहिट ठरले, असे म्हणावे लागेल. बॉलिवूडमध्ये एवढे दीर्घकाळ नाते टिकल्याची खूप कमी उदाहरणे आहेत. काजोलने घरच्यांचा विरोध असताना अजयशी लग्न करण्याचा निर्णय घेतला असला तरी आज मात्र तिच्या घरच्यांना देखील तिने घेतलेल्या निर्णयाचा अभिमान वाटतो...**

## प्रेम अन् विश्वासामुळे टिकले अजय-काजोलचे नाते!

काजोल आणि अजयची पहिली भेट झाली ती १९९५ मध्ये हलचल चित्रपटाच्या सेटवर. चित्रपटाच्या शूटिंगसाठी जेव्हा ती तयार झाली तेव्हा चित्रपटात हिरो कोण, असे सर्व जण विचारत होते. तेव्हा कुणीतरी सेटवर कोपऱ्यात बसलेल्या अजयकडे बोट दाखवले. त्यानंतर चित्रपटाच्या सेटवर आमच्यात मैत्री झाली, असे काजोलने सांगितले होते. जेव्हा त्यांची ओळख झाली तेव्हा अजय देवगण दुसऱ्या एका मुलीला डेट करीत होता आणि काजोलसुद्धा तिच्या बॉयफ्रेंडची तक्रार अजयकडे करीत होती. त्यानंतर काजोलचा ब्रेकअप झाला. आम्ही दोघांनी कधीच एकमेकांना प्रपोज केले नाही. मात्र तरीही आम्ही एकत्र असल्याचे आम्हाला वाटायचे, असे काजोलने तिच्या लव्ह स्टोरीबद्दल सांगितले होते. अजयने देखील त्यांच्या पहिल्या भेटीविषयी एका मुलाखतीत सांगितले होते. काजोल सेटवर खूप जोरजोरात बोलायची. त्यामुळे तिला पुन्हा भेटायची इच्छा होत नव्हती. तसे वागणे मला आवडत नव्हते, असे अजय म्हणाला होता.



मात्र त्यानंतर सर्वच बदलले, असे तो म्हणाला. अजय आणि काजोल ४ वर्षे एकमेकांना डेट करत होते. त्यानंतर त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. अजयच्या कुटुंबियांनी लग्नाला परवानगी दिली तरी काजोलच्या वडिलांनी मात्र तिच्यासोबत चार दिवस बोलणे बंद केले होते. काजोलने करिअरकडे लक्ष देण्याची गरज आहे, असे तिच्या वडिलांना वाटत होते. मात्र काही दिवसांनी काजोलच्या घरचे कसेबसे तयार झाले आणि २३ फेब्रुवारी १९९९ ला अतिशय साध्या पद्धतीने दोघांचे लग्न पार पडले. त्यानंतर गेली २३ वर्षे त्यांचा सुखाचा संसार सुरू आहे. दोघेही बॉलिवूडमध्ये असताना एवढे दीर्घकाळ नाते टिकणे ही सामान्य गोष्ट नक्कीच नाही. मात्र एकमेकांवरील प्रेम आणि विश्वास यामुळे दोघांचे नाते घट्ट झाल्याचे बॉलिवूडमध्ये बोलले जाते.

### एरिकाला जाड दिसण्यासाठी करावे लागत होते हे काम

एरिका फर्नांडिस सध्या टीव्ही मालिकांमध्ये काम करत आहे. असे असले तरी तिच्या करिअरची सुरुवात तिने मॉडेलिंग आणि दाक्षिणात्य चित्रपटाच्या माध्यमातून केली होती. आतापर्यंत तिने ७- ८ चित्रपटांमध्ये काम केले आहे. मात्र साऊथ इंडस्ट्रीत काम करण्याचा अनुभव अतिशय खराब राहिल्याचे एरिका फर्नांडिसने नुकत्याच एका मुलाखतीत सांगितले. माझ्या शरीरामुळे मला अनेकदा अपमानित केले जात होते, असे तिने मुलाखतीत सांगितले. एरिकाचा शेवटचा दाक्षिणात्य चित्रपट २०१७ मध्ये रिलीज झाला होता. मुलाखतीत तिने सांगितले, की मी तेव्हा खूप बारीक होते. साऊथ चित्रपटाला जशी आवश्यकता होती तशी मी नव्हते, असे चित्रपटाच्या दिग्दर्शकांना वाटत नव्हते. त्यांना चित्रपटात कामुक आणि मादक दिसणे अपेक्षित होते. त्यामुळे जाड दिसण्यासाठी कपड्यांच्या आत मला पॅड घालावे लागत होते. मांड्यावर थाय पॅडपासून तर शरीरावर खुप सारे पॅड बांधावे लागत होते. मी जशी आहे तशी स्वीकारली गेली नाही. शरीराच्या प्रत्येक जागेवर पॅड बांधावे लागले, असे ती म्हणाली.

## ४७ वर्षांची उर्मिला अद्याप का नाही झाली आई?

बॉलीवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीत अभिनेत्री ऊर्मिला मातोडकर यांनी अनेक हिट चित्रपटांमध्ये काम केले. आजही त्यांना रंगीला गर्ल म्हणून ओळखलं जातं. कारण हा चित्रपट त्यांच्या करिअरमधील सर्वात मोठा चित्रपट होता. २०१६ मध्ये मोसिन अख्तर यांच्यासोबत लग्न केल्यानंतर उर्मिला यांनी करिअरमधून ब्रेक घेतला. त्यानंतर त्या कोणत्याही चित्रपटात दिसल्या नाहीत. नुकत्याच एका मुलाखतीत त्यांनी फिल्मी करिअरपासून तर व्यक्तिगत आयुष्यापर्यंत अनेक गोष्टींवर खुलासा केला आहे. मातृत्वाबद्दल तुमचे काय मत आहे? आई होण्याचा तुम्ही विचार करत आहात का? किंवा मूल दत्तक घेण्याचा विचार आहे का? असा प्रश्न उर्मिला यांना विचारण्यात आला तेव्हा त्या म्हणाल्या, याचा मी फारसा विचार करीत नाही. जेव्हा जे व्हायचे ते होईल, असे उर्मिला मातोंडकर म्हणाल्या. प्रत्येक स्त्रीने आई असणे आवश्यकच आहे असे नाही. योग्य कारणांसाठी मातृत्व हवे. मला मुलं आवडतात पण जगात अशी अनेक मुलं आहेत, ज्यांना प्रेमाची गरज आहे, असे उर्मिला म्हणाल्या. सिनेसृष्टीला अलविदा करण्याबद्दल उर्मिला यांना विचारण्यात आले तेव्हा त्या म्हणाल्या की, मी अभिनय कारकिर्दीचा त्याग केला नाही. आयुष्यात अनेक टप्पे येतात आणि जातात आणि या सर्व टप्प्यांवर माझा विश्वास आहे. लग्न झाल्यावर मला लग्नाचा आनंद घ्यायचा होता. आयुष्य एका ट्रॅकवर चालवणे मला आवडत नाही. आयुष्याची अनेक रूपे असायला हवीत. मला सर्व काही मोकळेपणाने जगायचे आहे.


## लक्ष्मीकांत बेर्डेंची धाकटी लेकही पडद्यावर



दिवंगत लक्ष्मीकांत बेर्डे मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते होते. आपल्या अभिनयाने त्यांनी मनोरंजन क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली होती. मराठीबरोबरच बॉलीवूड चित्रपटातही त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला होता. आजही त्यांचे चित्रपट प्रेक्षकांना खळखळवून हसवतात. लक्ष्मीकांत बेर्डे यांची पत्नी प्रिया बेर्डे यासुद्धा लोकप्रिय अभिनेत्री आहेत. लक्ष्मीकांत व प्रिया यांना दोन मुलं आहेत. मुलगा अभिनय मनोरंजन विश्वात कार्यरत आहे. आता त्यांची धाकटी मुलगी स्वानंदीही लवकरच अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार आहे.

या अगोदर स्वानंदीने नाटक व एकांकिकेतून आपल्या अभिनयाची चुणूक दाखवली आहे. आता लवकरच तिचा पहिला चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'मन येड्यागत झालं' असे या चित्रपटाचे नाव आहे. या चित्रपटात स्वानंदीबरोबर अभिनेता सुमेद मुगदलकरची प्रमुख भूमिका आहे, तर अभिनेत्री श्वेता परदेशी सहकलाकाराच्या भूमिकेत झळकणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. या ट्रेलरला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळताना दिसत आहे. योगेश जाधव यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून, संदीप पांडुरंग जोशी, कुणाल दिलीप कंदकुर्ते व 'श्री वेद चिंतामणी प्रॉडक्शन' अंतर्गत या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. या चित्रपटातील गाण्यांनाही प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. निलेश पतंगे यांनी या गाण्यांना संगीत दिले असून या गाण्यांना जावेद अली, आदर्श शिंदे, हर्षवर्धन वावरे, आनंदी जोशी, निलेश पतंगे यांचा आवाज लाभला आहे. येत्या १ मार्चला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## भुताटकीच्या अनुभवांबद्दल अजय देवगण म्हणाला...



बॉलिवूडचा खरा ॲक्शन स्टार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अजय देवगणने आतापर्यंत अनेक सुरपहिट चित्रपटांमध्ये काम केले आहे. गेल्यावर्षी त्याचे भोला, चाणक्यसारखे चित्रपट प्रदर्शित झाले. बॉक्स ऑफिसवर या चित्रपटांनी चांगली कमाई केली होती. आता लवकरच त्याचा 'शैतान' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. मध्यंतरी याचा एक छोटासा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता नुकताच या चित्रपटाचा थरकाप उडवणारा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. काळी जादू, वशीकरण अशा भयानक गोष्टींवर या चित्रपटाचं कथानक बेतलेलं आहे. याच चित्रपटाच्या ट्रेलर लाँच दरम्यान अजय देवगणने त्याला आलेल्या अशाच काही भयानक अनुभवांबद्दल शेअर केलं आहे. अजय म्हणाला, की गेल्या बऱ्याच महिन्यांपासून मला एक हॉरर चित्रपट करायचा होता. याआधी मी 'भूत'सारखा चित्रपट केला आहे. मला हा प्रकार खूप आवडतो. कारण आजही बऱ्याच ठिकाणी काळी जादूसारखी गोष्ट अस्तित्त्वात आहे.

अशा अनैसर्गिक घटनांबद्दल बोलताना अजय म्हणाला, की मला असे भुताटकीचे बरेच अनुभव आले आहेत. आम्ही जेव्हा आऊटडोर शुटींगसाठी जायचो तेव्हा हे असे अनुभव आम्हाला बऱ्याचदा आले आहेत. त्यापैकी नेमकं किती खरं किती खोटं हे मला ठाऊक नाही. त्यापैकी काही घटना माझ्या लक्षातही आहेत. पण मी ज्यांना भेटलो आहे त्यांच्यापैकी अशी फार कमी लोक आहेत ज्यांचा या गोष्टीवर अजिबात विश्वास नाही. 'शैतान'मध्ये बॉलिवूडचे दोन दिग्गज अभिनेते अजय देवगण आणि आर. माधवन हे दोघे या प्रथमच एकत्र काम करत आहेत. ट्रेलरमध्ये आर. माधवनचं पात्र हे अजय देवगणवर चांगलंच भारी पडताना दिसत आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन विकास बेहल यांनी केलं आहे. 'शैतान' हा २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या गुजराती चित्रपट 'वश' चित्रपटाचा रिमेक असल्याचे सांगण्यात येत आहे. हा चित्रपट ८ मार्च २०२४ रोजी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अजय देवगणबरोबर आर. माधवन, साऊथची सुपरस्टार ज्योतिका यांच्याही प्रमुख भूमिका आहे.

## चिमुकल्या मुलीसाठी शाहिदने सोडलं धूम्रपान!



अभिनेता शाहिद कपूर बॉलीवूड इंडस्ट्रीमधील लोकप्रिय अभिनेता आहे. आपल्या करिअरची सुरुवात नृत्यापासून करणाऱ्या या अभिनेत्याने प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवलं. करिअरच्या या खडतर प्रवासात शाहिदला धूम्रपान करण्याची सवय लागली होती. परंतु, नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत त्याने सांगितलं की, धूम्रपान करणे त्याने कायमचे सोडले आहे आणि त्याचं कारणही तितकंच खास आहे.

अभिनेत्री नेहा धुपियाच्या 'नो फिल्टर नेहा' या चॅट शोमध्ये शाहिदने हजेरी लावली होती. या मुलाखतीत शाहिदने सिगारेट सोडण्यामागचं कारण सांगितलं. तो म्हणाला, की माझ्या मुलीपासून लपून मी धूम्रपान करायचो आणि याच कारणामुळे धूम्रपान सोडण्याचा मी निर्णय घेतला. एके दिवशी जेव्हा मी माझ्या मुलीपासून लपून धूम्रपान करत होतो तेव्हा मी स्वतःला सांगितलं की, हे असं लपून मी कायमच धूम्रपान करू शकणार नाही आणि त्याच दिवशी मी धूम्रपान सोडण्याचा निर्णय घेतला. शाहिद आणि त्याच्या मुलीचं बॉंडिंग खूप चांगलं आहे. अनेकदा तो त्याच्या कुटुंबासह माध्यमांसमोर आला आहे. शाहिद कपूर आणि मीरा राजपूत जुलै २०१५ मध्ये विवाहबंधनात अडकले. शाहिद आणि मीराला दोन मुले आहेत, मिशा आणि जैन. मीशा कपूर ही सात वर्षांची आहे, तर जैन हा चार वर्षांचा आहे. दरम्यान, शाहिदच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर, 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा चित्रपट ९ फेब्रुवारी २०२४ ला प्रदर्शित झाला. या चित्रपटात शाहिद कपूर आणि क्रिती सॅनोनची मुख्य भूमिका आहे. बॉक्स ऑफिसवर चांगली सुरुवात केल्यानंतर, 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया'ने ५० कोटींचा आकडा पार केला आहे. 'देवा' या अगामी चित्रपटात शाहिद कपूर पूजा हेगडेसह झळकणार आहे. हा चित्रपट ऑक्टोबर २०२४ रोजी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

## शॉर्ट न्यूज

### गोदावरी नदीवर सुरेगाव येथे पुल बांधावा

■ **नेवासा :** तालुक्यातील सुरेगाव व गंगापूर तालुक्यातील नेवरगाव या दोन गावांना जोडण्यासाठी गोदावरी नदीवर पूल बांधण्यासाठी महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची मंत्रालयात भेट घेऊन निवेदन दिले. या गोदावरी नदीवरील पुलामुळे नेवासा येथील संत ज्ञानेश्वर मंदिर, सद्गुरू नारायणगिरी महाराज आश्रम व श्री क्षेत्र देवगड, शनिशिंगणापूर आणि गंगापूर तालुक्यातील एकादशीला येणाऱ्या- जाणाऱ्या पायी दिंडीतील भक्तांना जवळचा व सुलभ मार्ग होईल.

### शिक्षकांची बदली थांबवा; विद्यार्थी आक्रमक

■ **पारनेर :** अहमदनगर जिल्हा मराठा शिक्षण संस्थेच्या टाकळी ढोकेश्वर येथील श्री ढोकेश्वर विद्यालयातील शिक्षक राहुल झावरे व अमोल ठाणगे या शिक्षकांची करण्यात आलेली बदली थांबवावी, म्हणून विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी थेट अहमदनगर मराठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांना निवेदन दिले. त्याचबरोबर ग्रामपंचायत टाकळी ढोकेश्वर यांचा ग्रामसभेचा ६ जुलै २०२४ रोजीचा ठराव घेतला आहे.

### शिक्षक पालक सहविचार सभेत केला संकल्प

■ **नगर :** तालुक्यातील वाळूज पब्लिक स्कूलच्या शिक्षक पालक सहविचार सभेत प्रत्येक पालकांना एक फळ झाड देऊन त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले. विद्यार्थी व पालक आपल्या घराच्या अंगणात दिलेले झाड लाऊन त्याचे संवर्धन करणार आहेत. सबाजीराव गायकवाड कृषी विकास प्रतिष्ठानच्या २२ व्या वर्धापन दिनानिमित्त वन महोत्सव उपक्रमातंर्गत शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीकोनाने हा उपक्रम राबविला.

### गावच्या विकास कामांचा झपाटा सुरू ठेवलाय

■ **श्रीगोंदा :** आमदार बबनराव पाचपुते यांच्याकडे तांदळी ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच, उपसरपंच तसेच माजी उपसरपंच सर्व सदस्य आणि ग्रामसेवक यांनी सतत पाठपुरावा करून तांदळी दुमाला गावातील गंगाधरे वस्ती हा रोड डांबरीकरण करण्यासाठी १ कोटी ६३ लक्ष रुपये निधी शासनाकडून प्राप्त केला. या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन युवा नेते विक्रम पाचपुते यांचे हस्ते करण्यात आले.

### निसर्ग व पर्यावरण मंडळाचे कार्य आदर्शवत

■ **वडगाव पान :** उष्णता, हवा, पाणी यांचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी ह्या कार्याची सुरुवात आपल्यापासून करावी. या कार्यप्रती निसर्ग व पर्यावरण मंडळाचे वृक्षसंवर्धनाचे कार्य आदर्शवत आहे, असे प्रतिपादन डॉ. शरद दुधाट यांनी केले. वडगावपान येथील डी. के. मोरे जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे निसर्ग व सामाजिक प्रदूषण मंडळाचे अहमदनगर जिल्हा कार्याध्यक्ष व नवनियुक्त पदाधिकारी बाळासाहेब कडू यांची मंडळावर नियुक्ती झाल्याबद्दल सन्मान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

# दिंडीतून आत्मशांती, आयुष्यात एकदा तरी करावी वारी

## ■ महंत संगमनाथ महाराज यांचे आवाहन ■ वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठानच्या दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

नगर : प्रतिनिधी

**विठ्ठलाच्या भेटीसाठी, मंदिराच्या कळसाच्या दर्शनासाठी निघालेला वारकरी तहान, भूक हरपून चालत राहतो आणि अगदी सहजरित्या चंद्रभागेच्या वाळवंटात पोहोचतो. त्यावेळी प्रत्येक वारकरी भक्तश्रेष्ठ या पदवीस प्राप्त झालेला असतो. दिंडीत सहभागी झाल्यास त्यास आत्मशांती लाभते. त्यासाठी प्रत्येकाने एकदा तरी वारी करावी. सध्या संपूर्ण राज्यात पांडुरंगाकडे जाण्याचा भाविकांचा ओढा वाढला असून, मोठ्या उत्साही वातावरणात अभंग व हरिनामाचा जयघोष करीत हजारो दिंड्या पंढरपूरकडे मार्गक्रमण करीत आहेत. त्यातून विचारांची देवाण-घेवाण होऊन धार्मिक वातावरण वाढीस लागत असल्याचे प्रतिपादन महंत संगमनाथ महाराज यांनी केले.**

वीर हनुमान वारकरी सेवाभावी प्रतिष्ठानच्या नगर ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथून झाले. यावेळी श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज, ज्ञानदेवराव लंके, सेवाभावी प्रतिष्ठानचे अध्यक्ष दत्ता जाधव, मार्गदर्शक बाबासाहेब भाऊसाहेब जाधव, उपाध्यक्ष राजेंद्र कानडे, सचिव झुंबर आव्हाड आदी




उपस्थित होते.

दिंडीविषयी माहिती देताना दत्ता जाधव म्हणाले, की बाबासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वीर हनुमान पायी दिंडी गेल्या अनेक वर्षापासून पंढरपूरला जाते. ही दिंडी शिस्तबद्ध असून, प्रत्येक वारकऱ्याची विशेष काळजी घेण्यात येत असल्याचे सांगितले. मार्केट यार्ड येथील हनुमान मंदिरात पादुकांची पूजा करण्यात आली. त्यानंतर ही दिंडी शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिर येथे आल्यानंतर विविध भागातून ही दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली. या दिंडीत भगवे पताका घेतलेले युवक, डोक्यावर तुलसी वृंदावन घेतलेल्या महिला जयघोष करीत होत्या.

या दिंडीत संजय महाराज महापुरे, राधिका राऊत, मनोहर महाराज सिनारे, ज्ञानेश्वर महाराज डांगरे, श्रीराम भक्त सत्संग सेवा मंडळ, श्रीराम मंदिर नवी पेठ यांचा हनुमान चालिसा पाठ, अमोल महाराज जाधव आदी वारकऱ्यांना सेवा देणार आहेत.


**पायी वारीचा असणार ११ दिवसांचा प्रवास**

नगर ते पंढरपुर हा ११ दिवसांचा प्रवास आहे. या दरम्यान वारकऱ्यांची ठिकठिकाणी नाष्टा, जेवण व राहण्याची व्यवस्था केली आहे. त्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभले असून, प्रत्येकाने आपआपली जबाबदारी स्वीकारली आहे. पंढरपुरच्या पांडुरंगाच्या दर्शनाची आस लागली आहे. धार्मिक कार्यक्रम व चांगल्या नियोजनामुळे या दिंडीची दिवसेंदिवस प्रचिती वाढत आहे. पंढरपुर येथेही दर्शनाची व्यवस्था केल्याचे दत्ता जाधव यांनी सांगितले.

## वाचकांच्या लेखणीतून

### भाषाशैली

कोणत्याही भाषेच्या साहित्यात भाषाशैलीला फार महत्त्व असते. शील या संस्कृत शब्दापासून शैली हा शब्द सिध्द झाला आहे. परंतु भाषाशैली म्हणजे काय? आजवर जेवढ्या म्हणून भाषाशैलीच्या व्याख्या करण्यात आल्या त्या साऱ्या आलंकारिक आहेत. शैली म्हणजे विचारांचे वस्त्र. याचे हे एकच उदाहरण येथे बोलके ठरेल. मात्र भाषाशैलीच्या काही व्याख्या सामान्य वाचकांस समजण्यास बोजड किंवा कठीण असतात.



मराठी भाषेत अनेक साहित्यिक व समीक्षकांनी भाषाशैलीवर भाष्य केलेले आहे. ना.सी.फडके, वा.के.लेले, रमेश धोंगडे, दिलीप धोंडगे यांनी या विषयावर सुंदर प्रकाश टाकलेला आहे.

ना.सी.फडके यांचे विवेचन सामान्य वाचकाला भावणारे आहे. प्रतिभा साधन या त्यांच्या ग्रंथात भाषाशैली नावाचे एक स्वतंत्र प्रकरणच वाचायला मिळते. त्यात ते म्हणतात, भाषेच्या अर्थ आणि ध्वनी या दोन अंगांची परस्पर अनुरक्ती म्हणजेच भाषाशैली होय. थोडक्यात, भाषेतील सहजता म्हणजे भाषाशैली होय असे ते म्हणतात.

साहित्यिकाची बुध्दी आणि अंत:करण्यातील भावनांचा परस्पर सुंदर भाषिक मेळ म्हणजे भाषाशैली होय, असे म्हणूया. काही उदाहरणे पाहू :-

तुझे काळीज माझ्या काळजाची बरोबरी करू शकणार नाही. ते काचेसारखे (नाजूक) होऊ शकणार नाही. हे दगडासारखे (कठोर) होऊ शकणार नाही. (उर्दू शेराचा अनुवाद करून)

रचनेशिवाय संघर्ष म्हणजे क्रियापदाशिवायचे वाक्य होय. (पहाटतारे, दादा धर्माधिकारी)


भुताचे पाय उलटे असतात. माणसाचे डोके उलटे असते. (रा.ग.गडकरी)

जितके लेखक तितक्या भाषाशैली असतात. वाचता वाचता, लिहिता लिहिता आणि बोलता बोलता आपली स्वत:ची भाषाशैली आकार घेत जाते. एखाद्या लेखकाच्या भाषाशैलीचे अनुकरण करून आपल्याला भाषाशैली साध्य होणार नाही. म्हणून ना.सी.फडके म्हणतात, भाषाशैली शिकविता येणार नाही, पण शिकता मात्र येईल.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,
जि. अहमदनगर.

# लंडनहून येणारी वाघनखं शिवरायांची नाहीतच !

## ■ खरी वाघनखं साताऱ्याबाहेर गेलीच नाहीत ■ इतिहासकार इंद्रजित सावंतांचा मोठा दावा



सातारा : प्रतिनिधी

**लंडनहून आणली जाणारी वाघनखं ही शिवरायांची नाहीत असा दावा इतिहासकार इंद्रजीत सावंत गेल्या अनेक महिन्यांपासून करत होते. आज त्यांच्या या दाव्याला लंडनच्या व्हिक्टोरिया अँड अल्बर्ट म्युझियमनेही पुष्टी दिल्याचे त्यांचं म्हणणे आहे.. ही वाघनखं छत्रपती शिवाजी महाराजांची आहेत यासाठी कोणताही पुरावा नाही असे पत्र या म्युझियमने इंद्रजित सावंतांना पाठवल्याचे त्यांनी म्हटलंय.. स्वतः इंद्रजित सावंतांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे.**

दरम्यान लंडन इथल्या म्युझियमने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना याबाबत पत्र पाठवले आहे. या पत्रात ही वाघ नख छत्रपती शिवाजी महाराजांची असल्याचा कोणताही पुरावा नसल्याचे म्हटले आहे. मग महाराष्ट्र सरकार ही वाघ नख छत्रपती शिवाजी महाराजांची असल्याचे खोटा दावा का करतेय असा प्रश्न त्यांनी उपस्थित केलाय. दरम्यान खरी वाघ नख ही साताऱ्यातून बाहेर गेल्याची किंवा कोणाला भेट दिल्याचा पुरावा नाही याबाबतची अधिकची माहिती उदयनराजे महाराज स्वतः देऊ शकतील. त्यांनी याबाबत पुढे येऊन बोलावं असेही इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांनी म्हटले आहे.

**व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझिअमने पत्रात काय लिहिले?**

इंद्रजीत सावंत, सरकार सध्या जी वाघनखे भारतात आणत आहे ती १९७१ साली व्हिक्टोरिआ अल्बर्ट म्युझिअमला गेली आहे. तशी सध्या सहा वाघनखे त्यांच्याकडे आहेत. ब्रिटिश म्युझिअम आणि व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझिअम ही दोन्ही वेगवेगळी संग्रहालय आहेत. मी सत्य सांगतोय ज्या संग्रहालायातून भारतात छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे आणत आहेत. ते संग्रहालय सांगत आहेत, ही वाघनखे छत्रपती शिवाजी महाराजांची नाहीत. ही गोष्ट संग्रहालयचे संचालकांनी हो गोष्ट करार करण्यासाठी महाराष्ट्रातून गेलेल्या मंत्र्यांच्या शिष्टमंडळाला स्पष्टपणे सांगितली आहे. तुम्ही ही वाघनखे भारतात घेऊन गेल्यानंतर ज्या संग्रहालयात वाघनखे ठेवणार आहे, तिथे ही वाघनखे छत्रपती शिवाजी महाराजांची आहे, याविषयी साशंकता असल्याचे स्पष्ट करावे, असे व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझिअमने पत्रात लिहिले आहे.

महाराष्ट्राची फसवणूक असून शिवाजी महाराजांचा अपमान व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझिअमने असे सांगितले असताना महाराष्ट्राचे मंत्री धादंत खोटे बोलत आहे. जी गोष्टी छत्रपती महाराजांची नाही ती गोष्ट महाराजांची आहे असे सांगत, त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करत आहे. ३० कोटींचा खर्च करत फक्त तीन वर्षासाठी असणार आहे.तसेच वाघनखांसाठी जे संग्रहालय तयार करण्यात येत आहे, त्यासाठी आठ कोटी खर्च करण्यात येत आहे. त्याचे टेंडर देखील महाराष्ट्राबाहेरील कंपनीला देण्यात आले आहे. ही महाराष्ट्राची फसवणूक असून छत्रपती शिवाजी महाराजांचा हा अपमान आहे.

# नगर जिल्हा परिषदेमार्फत वारकऱ्यांना आरोग्य सेवा

## जिल्ह्यातून जाणाऱ्या सर्व दिंड्यांना आरोग्य सुविधा



नगर : प्रतिनिधी

**अहमदनगर जिल्हा परिषदेच्या वतीने नगर जिल्ह्यातून जाणाऱ्या सर्व दिंड्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. दिंडी मार्गावर जेथे मुक्काम किंवा जेवणास वारकरी थांबतात, तेथे डॉक्टर व कर्मचारी स्टॉल लावून आरोग्य सुविधा देत आहेत. तसेच आरोग्य केंद्र असणाऱ्या ठिकाणी तेथील कर्मचारी दिंडी मार्गावर सेवेसाठी थांबत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नागरगोजे यांनी दिली.**

नगर-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर तुक्कड ओढा येथे वारकरी सेवा देण्यासाठी शिराढोण प्राथमिक आरोग्य केंद्र, रुईछत्तीसी आरोग्य केंद्रांतर्गत वारकरी सेवा कॅम्प लावले होते. त्याला डॉ. नागरगोजे यांनी नुकतीच भेट दिली. त्यांच्या हस्ते संत निवृत्तीनाथ पालखीचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. आशिष टाक, डॉ. सूर्यकांत यादव, वैभव चेन्नूर, मनीषा बनसोड, डॉ. शेजाल योगीता, विनोद पाटील, डॉ. सौरभ शिंदे, संदीप भालसिंग, संदीप फटांगरे, सचिन साळवे आदी उपस्थित होते. दिंडी या ठिकाणी जेवणासाठी थांबली होती. या दिंडीतील वारकऱ्यांना औषधे-गोळ्या, प्राथमिक उपचार आरोग्य विभागाच्या टीमने केले.

(पान १ वरून)

### वसंत मोरेंनी अखेर हाती घेतली मशाल

म्हणाले.तसेच उद्धव ठाकरे म्हणाले, वसंतराव काय करणार हे आम्ही पाहात होतो. ते पहिले शिवसैनिक होतात. शिवसेनेतून बाहेर गेल्यावर सन्मान मिळतो का हा अनुभव घेऊन तुम्ही स्वगृही परतले आहात. त्यामुळे तुमच्यावर आता मोठी जबाबदारी आहे. आता त्यांची शिक्षा हीच की त्यांनी पुण्यात शिवसेनेची ताकद वाढवली पाहिजे. लोकसभा निवडणुकीत जनतेने दिशा दाखवली. ती निवडणूक लोकशाहीसाठी होती. आता विधानसभेची लढाई ही राज्याच्या अस्मितेची असणार आहे. त्यात पुणे तर विद्येचे माहेरघर आहे. त्यामुळे पुणे सत्ताबदलाचे केंद्र झाले पाहिजे. मी अनेक दिवसांपासून पुण्यात आलो नाही. मात्र आता पुण्यातील शिवसैनिकांसाठी मी येणार आहे. पुणे आपल्याला भगवामय करायचे आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

**पुण्यात शिवसेनेची ताकद वाढणार- राऊत**

सर्वांनी मिळून आता पुण्यातील शिवसेना आपल्याला पुढे घेऊन जायची आहे, अशा भावना राऊतांनी व्यक्त केल्या आहेत. यावेळी संजय राऊत म्हणाले, मी वसंत तात्यांचे स्वागत करतो. खूप दिवसांनी पाऊस झाला आणि वसंत फुलला आहे. खूप दिवसांपासून वसंत मोरे काय करणार अशा चर्चा सुरू होत्या. अखेर ते मातोश्रीच्या मंदिरात दाखल झाले आहेत. ते आधी शिवसैनिक होते. त्यांच्या येण्याने नक्कीच पुण्यात शिवसेनेची ताकद वाढणार आहे. सर्वांनी मिळून आता पुण्यातील शिवसेना आपल्याला पुढे घेऊन जायची आहे, अशा भावना राऊतांनी व्यक्त केल्या आहेत.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
आमची वैशिष्ट्ये
१ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
ॲडमिशन ओपन
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# राळेगणसिद्धीच्या युवा वारकऱ्यांनी चार दिवसातच गाठली पंढरी !

## पुणे ते पंढरपूर २१० किलोमीटरची पायी वारी पुर्ण

राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**माय बाप सखा विठ्ठल विसावा त्याचे पाय ठेवा सदा मन आषाढी वारीची आठशे वर्षांहून अधिक जुनी परंपरा आहे. लाखोंच्या संख्येने वैष्णवांकडून २५० किलोमीटर एवढं अंतर ठराविक अवधीमध्ये पार केले जाते. या वारीमुळे महाराष्ट्राचं आध्यात्मिक आणि सांस्कृतिक जीवन समृद्ध झालेले आहे, अशा या वारीचे २१० किमीचे अंतर राळेगणसिद्धी येथील जयसिंग मापारी, सुनील मापारी, ज्ञानेश्वर मापारी, एकनाथ भालेकर, सुभाष गाजरे या युवा वारकऱ्यांनी केवळ चार दिवसांतच मजल दरमजल करत पूर्ण केले आहे.**

बुधवारी (दि. ३) सकाळी ८ वाजता हडपसर, पुणे येथून सुरू झालेली ही पायीवारी जेजुरी (पुणे), काळज (सातारा), मोरोची (सोलापूर), वेळापुर (सोलापूर) असा प्रवास करत पंढरपूरमध्ये रविवारी (दि. ०७) दुपारी एक वाजता पांडुरंगाच्या दरबारात पोहोचली. तर सुभाष गाजरे यांनी पुणे ते नीरा असे जवळपास १०० किमीचे अंतर पूर्ण केले. मात्र तब्येतीच्या अस्वस्थतेमुळे त्यांना पुढील वारी पूर्ण करता आली नाही. पुढील वर्षी ही वारी पूर्ण करण्याचा संकल्प त्यांनी यावेळी बोलून दाखविला.

ज्ञानेश्वर मापारी, सुनील मापारी, एकनाथ भालेकर, सुभाष गाजरे यांच्या संकल्पनेतून हा पायी वारीचा उपक्रम राबविण्यात आला होता. तसेच २०२३ साली जयसिंग मापारी यांनी आपल्या मोठ्या बहिणीसोबत पायी वारी केली असल्याने त्यांच्या अनुभवाचा फायदा सर्वांनाच झाला. या सर्वांनी चार दिवसांत २१० किमी पायी वारी पूर्ण केल्याने सर्व स्तरांतून या सर्व वारकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे.

**२१० किमीची पायी वारी पूर्ण करण्यासाठी शारीरिक क्षमतेबरोबर मानसिक आणि भावनिक क्षमतेचा कस लागतो.**
एकनाथ भालेकर



**पुणे ते पंढरपूर हे जवळपास २१० किमीचे अंतर चार दिवसांत चालत पूर्ण करण्याचा संकल्प केला होता आणि या सर्वांनी हा संकल्प पूर्ण केला याचा मला विशेष आनंद आहे.**
सुभाष गाजरे

**पायी वारी हे फक्त पुणे ते पंढरपूर स्पर्धा नसून महाराष्ट्राच्या वारीच्या लाखो वर्षांच्या परंपरेतून प्रेरणा घेऊन स्वतःच स्वतःच्या शारीरिक क्षमतांना दिलेलं आव्हान आहे. हे चालण वारीएवढंच स्वर्गसुख देणारं आहे.**
सुनिल मापारी

**४२ किमीची मॅरेथॉन तर जगप्रसिद्ध आहेच. दक्षिण आफ्रिकेत देखील ९० किलोमीटर अंतराची कॉम्रेड मॅरेथॉन तेवढीच आव्हानात्मक आहे. कात्रज ते सिंहगड, अशा विविध स्पर्धांच्या उपक्रमांमधून प्रेरणा घेऊन पायीवारीची संकल्पना सुचली. यापुढे हा पायी वारीचा उपक्रम सतत सुरू ठेवणार आहे.**
ज्ञानेश्वर मापारी, माजी सैनिक

**पायी वारीचा मुख्य संदेश आरोग्य जपण्याबरोबरच आपल्या पर्यावरणाचे संवर्धन करणे, झाडे लावा, झाडे जगवा, पाणी आडवा, पाणी जिरवा हा होता.**
जयसिंग मापारी

**माजी सैनिक ज्ञानेश्वर मापारी यांची या महिन्यात दुसऱ्यांदा पंढरपूर वारी झाली. दोन आठवड्यांपूर्वी त्यांनी सायकलवर राळेगणसिद्धी ते पंढरपूर अशी सायकलवारी केलेली होती. तर दुसरी वारी पुणे ते पंढरपूर अशी पायी चालत पूर्ण केली.**

# कुंदा आबूज सारोळा अडवाईच्या उपसरपंच

## ■ बिनविरोध निवड ■ खा.लंकेंकडून अभिनंदन

सारोळा अडवाई : प्रतिनिधी

**सारोळा अडवाईच्या उपसरपंचपदी कुंदा गणेश आबूज यांची सोमवारी बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच कोमल महांडूळे यांनी राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर आबूज यांची एकमताने निवड करण्यात आली.**

सारोळा अडवाई ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक झाली त्यावेळी सरपंच, उपसरपंच पदासाठी अडीच वर्षांचा कार्यकाळ निश्चित करण्यात आला होता. सरपंच परशुराम फंड यांनी त्यांचा ठरलेला कार्यकाळ संपल्यानंतर आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर नीलेश लंके प्रतिष्ठाणचे पदाधिकारी दत्तात्रेय शिंदे यांची सरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली होती. तर उपसरपंच कोमल महांडूळे यांनी राजीनामा दिल्यानंतर कुंदा गणेश आबूज यांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात येऊन सोमवारी त्यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली.



■ सारोळा अडवाईच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्यानंतर कुंदा आबूज यांचा सत्कार करण्यात आला.

### खा. लंके यांच्या माध्यमातून कामे मार्गी लावणार

**खा. नीलेश लंके यांनी सारोळा अडवाई ते जामगांव, खोडदेबाबा मंदिर या रस्त्यांचे कोटयावधी रूपये निधीची कामे मार्गी लावली आहेत. रस्त्यांबरोबरच दगडी साठवण बंधारे, स्मशानभुमी सुशोभीकरण, सेवा संस्था इमारत अशी गावाच्या इतिहासात प्रथमच भरीव कामे मार्गी लावली आहेत. खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून भविष्यकाळात उर्वरीत विकास कामांचा अनुशेष भरून काढण्यासाठी मी कटीबध्द आहे.**
कुंदा गणेश आबूज
नवनिर्वाचित उपसरपंच
सारोळा अडवाई

### खा. लंके यांच्याकडून अभिनंदन

**सारोळा अडवाईच्या उपसरपंचपदी कुंदा आबूज यांची निवड झाल्यानंतर खा. नीलेश लंके, जि. प. च्या माजी सदस्या राणीताई लंके यांनी आनंद व्यक्त करीत त्यांचे अभिनंदन केले. सारोळा अडवाईसाठी आजवर भरीव निधी दिला असून भविष्यातही निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याचे खा. लंके व राणीताई लंके यांनी सांगितले.**

# स्व.संदीप वराळ पाटील यांचे कार्य जनतेसाठी प्रेरणादायी होते

## सरपंच पंकज कारखिले यांचे प्रतिपादन । जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम



निघोज : प्रतिनिधी

**निघोज गावचे माजी सरपंच व बाजार समितीचे माजी उपसभापती स्व. संदीप वराळ पाटील यांनी आठ वर्षांच्या कार्यकाळात सामाजिक क्षेत्रात मोठे योगदान देऊन निघोज गावचा नावलौकिक जिल्ह्यात केला असून त्यांचे कार्य जनतेसाठी प्रेरणादायी होते असे प्रतिपादन राळेगण थेरपाळचे सरपंच पंकज कारखिले यांनी व्यक्त केले.**

संदीप पाटील वराळ यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप मुख्याध्यापक कैलास शिंदे, सुभाष महाराज मगर, शिक्षक काळे, काळोखे, दिघे, बेलोटे तसेच संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

वराळ भावकीचे ज्येष्ठ कारभारी भास्करराव वराळ पाटील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. सरपंच कारखिले यावेळी म्हणाले विखे पाटील फौंडेशनच्या माध्यमातून रक्तपेढीने रक्तदान शिबिरास सहकार्य केले असून ११० रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. तसेच गाव व परिसरातील तीनशेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले आहे. अशाप्रकारे सामाजिक कार्य करीत संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन व पदाधिकारी व सदस्य यांनी खऱ्या अर्थाने संदीप पाटील वराळ यांच्या सामाजिक कार्याचे अनुकरण करीत त्यांच्या कार्याला उजाळा देण्याचे काम केले आहे.

यावेळी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले तसेच यामध्ये ज्यांनी योगदान दिले त्यांना धन्यवाद व्यक्त केले.

# राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी हर्षदा मापारी

## खा.नीलेश लंके यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

राळेगणसिद्धी : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील राळेगणसिद्धी येथील हर्षदा शाम मापारी यांची राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे यांच्या मान्यतेनुसार जिल्हाध्यक्ष सुरज मोरे यांनी पत्राद्वारे ही नियुक्ती केली आहे.**

नुकतीच राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाची अहिल्यानगर जिल्ह्याची कार्यकारणी जाहीर झाली असून या कार्यकारणीमध्ये कायम विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर भूमिका मांडून त्यांना वेळोवेळी न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या हर्षदा मापारी यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. खासदार नीलेश लंके , राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांच्या हस्ते मापारी यांना नियुक्तीचे पत्र देण्यात आले.



■ राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी हर्षदा मापारी यांची नियुक्ती झाल्याबद्दल खासदार नीलेश लंके ,जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

या निवडीचे माजी जि.प.सदस्या राणीताई लंके, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला तालुकाध्यक्षा सुवर्णा धाडगे, युवतीच्या तालुकाध्यक्षा पुनम मुंगसे यांनी स्वागत केले आहे. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार या संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडून त्यांना सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही हर्षदा मापारी यांनी नियुक्तीनंतर बोलताना दिली.

# आंतरधर्मीय विवाहाची परिणीती तरूणाच्या हत्येत

## ■ बहिणीचा संसार भावानेच केला उद्धस्त ■ रांधे येथील तरूणाचा मोशी येथे खून ■ पारनेर तालुक्याच्या ग्रामीण भागातील घटनेने खळबळ

भोसरी : प्रतिनिधी

**आंतरधर्मीय विवाह केल्याच्या रागातून तरूणीच्या भावाने,नातेवाईकांच्या मदतीने आपल्या मेहुण्याचा खून केल्याचा प्रकार मोशी (भोसरी,पुणे) औद्योगिक परिसरात घडला आहे.हत्या झालेला तरूण पारनेर तालुक्यातील रांधे येथील आहे.तीन आठवड्यापूर्वी,१५ जून रोजी घडलेल्या प्रकाराचा छडा लावण्यात पिंपरी चिंचवड पोलिसांना यश आले आहे.अमीर शेख असे हत्या झालेल्या तरूणाचे नाव आहे.**




यासंदर्भात भोसरी एमआयडीसी पोलिसांकडून तसेच स्थानिक पातळीवर मिळालेली माहिती अशी की,अमीर शेख व त्याच्या शेजारी राहणाऱ्या तरूणीने चार महिन्यांपूर्वी आपल्या कुटुंबाच्या अपरोक्ष आळंदी (पुणे) येथे आंतरधर्मीय विवाह केला होता.त्यानंतर ते दोघे मोशी (भोसरी,पुणे) येथे राहत होते.अमीर खासगी वाहनावर चालक म्हणून काम करून उदरनिर्वाह चालवत होता.

बहिणीने आंतरधर्मीय विवाह केल्याचा राग तिच्या भावाला होता.या रागातून तरूणीच्या भावाने आपला मेहुणा व अन्य एका नातेवाईकांच्या मदतीने १५ जून रोजी अमीरचा गळा आवळून खून केला व त्याचा मृतदेह आळंदी - चाकण रस्त्यावर निर्जन ठिकाणी,झाडा झुडपांमध्ये नेऊन जाळला.

दरम्यान अमीरच्या पत्नीने आपला पती बेपत्ता झाला असल्याची तक्रार भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल केली.त्यानंतर तरूणीच्या नातेवाईकांनी अमीरचा घातपात केला असल्याचा संशय अमीरच्या वडिलांनी भोसरी पोलिसांकडे व्यक्त केला.पोलिसांनी त्या दिशेने तपास केला असता आमीरच्या खूनाचा छडा लागला.

अमीरच्या हत्येप्रकरणी पंकज विश्वनाथ पाईकराव, गणेश दिनेश गायकवाड, सुशांत गोपाळा गायकवाड, सुनील किसन चक्रनारायण या आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून पंकज पाईकराव, सुशांत गायकवाड व सुनील चक्रनारायण यांना अटक केली असल्याची माहिती पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त शिवाजी पवार यांनी दिली.

### प्रेमविवाहाने कुटुंबात दरी

**मयत अमीर शेखचे त्याच्या घराशेजारी राहणाऱ्या तरूणीशी प्रेमसंबंध होते.दोघांची कुटुंबे गेल्या वीस वर्षांपासून एकमेकांचे शेजारी रहात होते.दोन्ही कुटुंबात जिव्हाळ्याचे,सलोख्याचे संबंध होते.दोन्ही कुटुंबाच धर्म,जात वेगळी.मात्र त्यांच्या जिव्हाळ्याचा संबंधात जात,धर्म कधी आडवे आले नाहीत.गुण्यागोविंदाने राहणाऱ्या या कुटुंबात मात्र प्रेमविवाहाने मोठी दरी निर्माण झाली. आणि त्याची परिणीती तरूणाच्या हत्येत झाली.या प्रकारामुळे रांधे तसेच पारनेर तालुक्याच्या पश्चिम भागात खळबळ उडाली आहे.**

# नगरे गुरुजींचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

## वसतीगृहातील मुलांना शैक्षणिक साहित्य व अन्नदान

पारनेर : प्रतिनिधी

**सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रकाश दयाराम नगरे गुरुजी यांच्या वाढदिवसानिमित्त येथील सिद्धार्थ वसतीगृह आणि धम्मपद मोनिस्ट्री येथे मुलांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप करण्यात आले तसेच सर्व मुलांना अन्नदान करण्यात आले.**

याप्रसंगी तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत , राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.वाढदिवसानिमित्त अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये सचिन नगरे यांनी प्रास्ताविक केले तर राजेंद्र करंदीकर , संपत पवार दादाभाऊ शेटे,मोरे सर , प्रणाली रामफळे वैरागर सर, गायकवाड सर आणि देवदत्त साळवे (धम्म पद मॉनेस्ट्री)आणि इतर सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रकाश नगरे गुरुजी यांच्याबद्दल सविस्तर शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल सर्वांना माहिती दिली.



प्रकाश नगरे गुरुजी यांनी मुलांना व उपस्थित असलेल्या सर्वांना सामाजिक व शैक्षणिक कार्याबद्दल मार्गदर्शन केले त्यानंतर त्यांच्या हस्ते मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले याप्रसंगी शैक्षणिक सामाजिक व राजकीय सर्वच क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.यामध्ये बाळासाहेब नगरे, रमेश गायकवाड ,शरद नगरे, चंद्रकांत गायकवाड ,सुरेश वैरागर सर ,रवींद्र गायकवाड सर,वीरेंद्र पवार सर , शंकर मोरे सर, किरण सोनवणे ,अनिल सातपुते ,सुखदेव रामफळे ,विकास पवार, विलास साळवे ,राजू पवार ,निलेश विधाटे , शुभम साळवे तसेच शुभांगी पवार ,कीर्ती पवार , लता पवार ,प्रणाली रामफळे , मोनिका सूर्यवंशी, प्रतिभा रामफळे ,प्रमिला सूर्यवंशी आणि पारनेर व पारनेर परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन प्रथमेश प्रणाम नगरे आणि सिद्धी प्रणाम नगरे यांनी केले
तसेच सर्वांचे आभार प्रणाम प्रकाश नगरे आणि कुंदा प्रणाम नगरे यांनी मानले.

# नुकसानग्रस्त पिकांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ द्यावा

## ■ मका व सोयाबीनची उर्वरित अग्रीम रक्कम देण्याची मागणी ■ विश्वनाथ कोरडे यांचे जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना निवेदन

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२३-२०२४ च्या खरीप हंगामातील सोयाबीनच्या पिक विमा योजनेची उर्वरित अग्रीम रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी या मागणीचे पत्र भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांना दिले.**

यावेळी श्री.कोरडे यांच्यासोबत भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे , बाभुळवाडे वि.का.सोसायटीचे चेअरमन दत्ता जगदाळे, सोपान मुंजाळ, प्रशांत जगदाळे, प्रदीप इंगळे, मनसुख कोरडे, आप्पाभाऊ गोपाळे, भरत ढुबे, सखाराम भागवत आदी. तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.



संबंधित पत्रामध्ये पारनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना सन २०२३-२०२४ च्या खरीप हंगामातील सोयाबीन व मका या पिकांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेची २५ टक्के अग्रीम रक्कम देण्यात आली होती. त्यानंतर प्रदीर्घ कालावधी लोटूनही राहिलेली उर्वरित रक्कम अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नसल्याचे म्हटले असून संबंधित रक्कम त्वरित मिळावी अशी मागणी कोरडे यांनी केली आहे.

जिल्हा कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या या पत्रात पुढे म्हटले आहे कि त्याच वेळी खरीप हंगामात बाजरी, मुग या पिकांसह सर्वच पिकांचे तालुक्यातील काही भागात पावसाअभावी तर काही भागात अवेळी झालेल्या गारपिटीमुळे शेतातील पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असल्याने तालुक्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणात आर्थिक अडचणीना तोंड देत आहे. तरी सदरच्या शेतकऱ्यांना तातडीने प्रधानमंत्री पिक विमा योजनेचा लाभ मिळवून देत या ओढवलेल्या अस्मानी संकटातून बाहेर पडण्यासाठी त्यांना सहकार्य करावे अशी मागणीही करण्यात आली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com